Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ९, अंक २] शनिवार, जानेवारी २८, २०२३/माघ ८, शके १९४४ [पृष्ठे ०३, किंमत : रुपये १८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २.

**आयुक्त, महानगरपालिका, यांजकडून**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ चे कलम ३(१) अन्वये**

**शुद्धीपत्रक**

क्रमांक साप्रवि-११६-एम-२०२३.—

महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ चे कलम ३(१) अन्वये अधिसूचना दिनांक १२ डिसेंबर २०२२-अग्रहायण २१ शके १९४४ रोजी ४७ सेवा च्या अधिसूचनेद्वारे प्रकाशित करण्यात आले आहे.

व्यवसाय सुलभता धोरणाच्या (Ease of doing Business) च्या अनुषंगाने विविध घटकांअंतर्गत येणा-या महत्त्वाच्या सेवा, आवश्यक कागदपत्र, शुल्क, कालमर्यादा पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी लोकसेवा हक्क अधिनियमाअंतर्गत अधिसूचित करण्याबाबत शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९२२-प्र.क्र. ३२- नवि-३२, दिनांक १५ डिसेंबर २०२२ अन्वये हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाची एक सेवा (अनु. क्र. ०१), घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या एकूण २ सेवा (अनु. क्र. ०२, ०३) व पाणीपुरवठा विभागामध्ये एक सेवा (अनु. क्र. ०४) मध्ये समाविष्ट करण्यात येत असून तसेच पर्यावरण, वातावरण व बदल विभाग शासन निर्णय क्र. वृसंअ २०२२-प्र.क्र. १४८-तां.क-२, दिनांक २० डिसेंबर २०२२ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मध्ये (अनु. क्र. ०५) एकूण १ सेवांची भर घालण्यात येत आहे. अश्या एकूण ०५ सेवांचा असाधारण राजपत्र शुद्धीपत्रात समावेश करून तत्पूर्वी ४७ सेवा प्रकाशित करण्यात आलेल्या असून याव्यतिरिक्त एकूण ०५ सेवा खालील विवरणपत्रात नमूद लोकसेवेचे नाव,

आवश्यक कागदपत्रे, फी सेवा देणारा पदनिर्देशित अधिकारी, नियम कालमर्यादा, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी इत्यादी तपशील या अधिसूचनेद्वारे अधिसूचित करीत आहे.

## अनुसूची

| अ.क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्र | नियत कालमर्यादा | निश्चित केलेली फी | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | | **हॉटमिक्स प्लॉन्ट विभाग** | | | | | |
| १ | रस्ता खोदाई परवानगी देणे (To grant road cutting permission) नविन परवाना व नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित मनपाची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र.<br>३. शासनाद्वारे वेळोवेळी विहीत केली जातील अशी आवश्यक कागदपत्रे. | ३० दिवस | महानगरपालिका स्तरावर वेळोवेळी निश्चित केलेले दर | उप अभियंता (मुख्यालय/ संबंधित झोन) | कार्यकारी अभियंता (मुख्यालय/ संबंधित झोन) | अधिक्षक अभियंता (सा.बां.वि.) |
| | | **घनकचरा व्यवस्थापन विभाग** | | | | | |
| २ | राज्याच्या खाद्य परवान्याकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-हरकत प्रमाण-पत्र देणे (To issue NOC from Municipality or other Local Body for State Licens for Food Business) | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित मनपाची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र.<br>३. ज्या इमारतीत सदर आस्थापना/ कारखाना होणार त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतचे कागदपत्रे.<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | ३० दिवस | रु. २००० | सहा. आयुक्त | उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग | संबंधित अति. आयुक्त |
| ३ | खाद्य नोंदणी प्रमाणपत्राकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आरोग्यविषयक ना-हरकत प्रमाण पत्र देणे (To issue NOC from Municipality or other Local Body for State Licens for Food Business) | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित मनपाची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र.<br>३. ज्या इमारतीत सदर आस्थापना/ कारखाना होणार त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतचे कागदपत्रे.<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | ३० दिवस | रु. २००० | सहा. आयुक्त | उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग | संबंधित अति. आयुक्त |

**अनुसूची—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **पाणीपुरवठा विभाग** | | | |
| ४ | पाणी उपसा करणेसाठी केंद्रीय भूजल सर्वेक्षण विभाग (अथवा इतर संबंधित विभाग) यांचे ना-हरकत प्रमाणपत्राकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे पाणी अनुपलब्धता प्रमाण पत्र देणे (To issue Certificate of Non availability of Water from Water Supply Agency required for NOC for Water abstraction from Central Ground Water Authority/ Relevant Authority | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित म.न.पा.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र.<br>३. ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र घेणेबाबतचे व पर्जन्य जल पुनर्भरण करणेबाबतचे प्रतिज्ञापत्र.<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | ३० दिवस | महानगरपालिका स्तरावर वेळोवेळी निश्चित केलेले दर | कनिष्ठ अभियंता (पाणीपुरवठा), मुख्यालय | उपअभियंता (पाणीपुरवठा), मुख्यालय | कार्यकारी अभियंता अति. आयुक्त (पाणीपुरवठा), मुख्यालय |
| | | | | **वृक्ष व प्राधिकरण विभाग** | | | |
| ५ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ मधील कलम ८ मधील तरतुदीनुसार नॉन हेरीटेज व २०० पेक्षा कमी वृक्ष तोड परवानगी देणे तसेच नॉन हेरीटेज झाडाच्या व हेरीटेज झाडाच्या फांद्या छाटणी करीता परवानगी देणे | १. लेखी अर्ज<br>२. झाडे तोडण्याची कारणे.<br>३. आवश्यकतेनुसार जागेचा मंजूर बांधकाम नकाशा.<br>४. तोडणा-या झाडाचे रंगीत छायाचित्र.<br>५. झाडे असलेल्या जागेसंबंधी आवश्यक कागदपत्रे.<br>६. चालु वर्षाची घर टॅक्स पावती. | ४५ दिवस | म.न.पा स्तरावर वेळोवेळी निश्चित केलेले दर (झाडाच्या संख्येनुसार) | उद्यान अधिक्षक | उपायुक्त (उद्यान) तथा वृक्ष अधिकारी | आयुक्त/ वृक्ष प्राधिकरण समिती |

**राधाकृष्णन बी.** (भा.प्र.से),
आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

नागपूर :
दिनांक २७ जानेवारी २०२३.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.